जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 4 AUG 2021
पुढारी

# धर्मनिरपेक्षता मूल्यातूनच लोकशाही बळकट

## 'लोकशाही आणि अल्पसंख्याक विचार' वेबिनारमध्ये तज्ज्ञांचा सूर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

धर्मनिरपेक्षता या घटनात्मक मूल्याची जोपासना कसोशीने केल्यास लोकशाही व्यवस्था अधिक बळकट होण्यास मदत होईल, असा सूर 'लोकशाही आणि अल्पसंख्याक विचार' या विषयावरील एकदिवसीय वेबिनारमध्ये विविध तज्ज्ञांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण अध्यासन व यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलमेंट (वायसीएसआरडी) अधिविभागातर्फे वेबिनारचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के होते. डॉ. महावीर शास्त्री म्हणाले, भगवान महावीर यांच्या काळातच लोकशाहीची बीजे रोवली गेली होती. अनेक धर्मांना सामावून घेणारा महावीरांचा अनेकान्तवाद याचे उत्तम उदाहरण आहे.

डॉ. शमशुद्दीन तांबोळी म्हणाले, भारतात अल्पसंख्य असलेल्या मुस्लीम समाजाने इतरांचे अनुकरण करण्यापेक्षा नीटपणे इस्लाम समजून घेणे आवश्यक आहे. कृष्णा मेणसे म्हणाले, बसवेश्वर वैज्ञानिक दृष्टिकोनाचे होते. जातव्यवस्था संपल्याशिवाय लोकशाही मूल्ये रुजणार नाहीत, अशी त्यांची धारणा होती. डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, परिघाबाहेरील समाजाला मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक आहे. विशेषतः अल्पसंख्याकांचे प्रश्न समजून घ्यावे लागतील.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, लोकशाही मूल्ये रुजण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. लोकशाहीला अनेकवेळा हादरे बसले असले, तरी प्रत्येक वेळी लोकशाही त्यातून अधिक बळकट होत गेली. लोकशाहीत परस्पर सामंजस्य खूप महत्त्वाचे आहे. डॉ. नितीन माळी यांनी स्वागत केले. डॉ. वैशाली भोसले, डॉ. संतोष सुतार यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यशवंतराव चव्हाण स्कूलचे प्रभारी संचालक प्रा. प्रकाश पवार यांनी वेबिनारबद्दल माहिती दिली. डॉ. कविता वड्राळे यांनी आभार मानले.

04 AUG 2021
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी ईमेल आयडी, मोबाईल नंबर अपडेट करावेत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत एप्रिल–मे २०२१ मध्ये घेण्यात येणारी उन्हाळी ऑनलाईन परीक्षा ऑगस्टमध्ये होणार आहे. या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी संगणक प्रणालीत आपला मोबाईल नंबर, ईमेल आयडी अपडेट करावयाचा आहे. **http://studentapps.unishivaji.ac** या लिंकवर माहिती अपडेट करण्यासाठी ५ ऑगस्टपर्यंत मुदत आहे. यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार स्वीकारला जाणार नाही. अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार इंजिनिअरिंग, फार्मसी, आर्किटेक्चर, लॉ, एज्युकेशन, एमबीए या व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा क्लस्टर पध्दतीने होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 AUG 2021
पुढारी

# विद्यापीठातर्फे उन्हाळी सत्र परीक्षेसाठी मोबाईल, ई-मेल आयडीत बदल करण्याची सुविधा उपलब्ध

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने उन्हाळी सत्राच्या परीक्षा ऑगस्टमध्ये घेण्यात येणार आहेत. परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडीमध्ये बदल करण्यास विद्यापीठातर्फे लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे.

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची माहिती ५ ऑगस्टपर्यंत अद्ययावत करणे गरजेचे आहे. त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही. कोणताही पत्रव्यवहार स्वीकारला जाणार नसल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी.आर.पळसे यांनी दिली.